## जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दिनांक ०९/११/२०२० वेळ सकाळी ११.३० वा चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दिनांक ०९/११/२०२० रोजी सकाळी ११.३० वाजता मा. श्री कौस्तुभ दिवेगावकर मा. प्र. से. जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय सभागृह उस्मानाबाद येथे संपन्न झाली. सर्वप्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती उस्मानाबाद यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा अध्यक्षांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली. त्यानंतर महाव्यवस्थापक PPT द्वारे प्रास्ताविक करुन समितीची रचना व कार्य यांची सविस्तर माहिती दिली.सभेस उपस्थिती पटाप्रमाणे १६ सदस्य उपस्थित होते. मा. प्रविण नलावडे, उपसंचालक DGFT पुणे हे Online उपस्थित होते.

केंद्रशासनाच्या वाणिज्य व उद्योग मंत्रालयाच्या विदेश व्यापार महानिदेशालय, नवी दिल्ली (DGFT) यांच्या २६.१२.२०२० च्या पत्रान्वये व उद्योग उर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासनाच्या दि. १९.१०.२०२० च्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरीय जिल्हा प्रचालन समितीची स्थापना करण्यात आली आहे. उस्मानाबाद जिल्हातील निर्यात वाढीसाठी विविध केंद्र व राज्य शासनाची जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यातदार, सल्लागार यांचेशी सातत्याने समन्वय साधून अडीअडचणी दुर करण्याच्या उद्देशाने सदर समिती काम करणार आहे.

| अ. क्र. | मुद्दा उपस्थित करणाऱ्याचे नांव | मुद्याचे स्वरुप | चर्चेअंती मा. अध्यक्षांनी दिलेल्या कार्यवाहीचे निर्देश | संबंधित कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | महाव्यवस्थापक, जिउके उस्मानाबाद | जिल्हा निर्यात आराखडा तयार करण्यासाठी स्टेक होल्डर्स कडून सुचना मागविणे. | मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्हा मध्ये निर्यातक्षम कृषी व औद्योगिक उत्पादनाची माहिती घेवून यादी करणेबाबत निर्देश केले. तसेच संबधीत यंत्रणा व उपस्थित सदस्य यांचेकडून निर्यात वाढीसाठी उपयुक्त सूचना अडचणी याबाबत लेखी निवेदन जिल्हा उद्योग केंद्राकडे सादर करण्याबाबत निर्देश दिले. | महाव्यवस्थापक जिउके उस्मानाबाद |
| २ | श्री अमित महांत मे.बालाजी अमाईन्स लि. तामलवाडी | मे. बालाजी अमाईन्स लि. तामलवाडी,सहाय्यक व्यवस्थापक (निर्यात) श्री अमित महांत यांनी Methyl & Ethyl Amines उत्पादीत करुन JNPT द्वारे ४५ देशामध्ये निर्यात होते एकूण ४ प्लॅन्ट असून एकूण उलाढाल १००० कोटी असल्याचे व त्यापैकी ३०० कोटीची निर्यात असल्याचे नमुद केले. निर्यात प्रक्रिया बाबत एक खिडकी योजना प्रणाली असावी असे नमुद केले. | या बाबत DGFT याना निर्यात प्रक्रियाबाबत एक खिडकी योजना विषयी माहिती देणे बाबत मा. अध्यक्षानी सुचित केले. | DGFT पुणे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | श्री राजेश गोस्की, टेरीटॉवेल उत्पादक, इटकळ ता. तुळजापुर | सोलापूर येथील उद्योग घटकातून टेरी टॉवेलचे ७-८ कोटीचे उलाढाल होते व युरोपीयन देशाना निर्यात चालू असल्याचे सांगितले इटकळ ता. तुळजापूर येथे उद्योग घटकाचे बांधकाम सुरु होणार असल्याचे आणि पावर लुम कमी होत असल्या बाबत अडचन सांगितले. गारमेंट क्लस्टर भूम ची मदत घेऊन निर्यातक्षम उत्पादने तयार करता येईल असे नमुद केले. निर्यात विषयक सेमिनार घेऊन रिसोर्स मॅपींग करावे अशी मागणी केली. | मा. अध्यक्षांनी जिल्हयामध्ये निर्यात विषयक सेमिनार / प्रशिक्षण शिबीरे आयोजन करावे असे DGFT यांना याबाबत कार्यवाहीचे निर्देश दिले. | DGFT पुणे |
| ४ | श्री वैभव फड, द्राक्ष उत्पादक जळकोटवाडी | कोल्ड स्टोरेजची व्यवस्था अपुरी असल्या बाबत व एक्सपोर्ट पॅकेर्जींग सुविधा व्हाव्यात व त्याचे सविस्तर प्रशिक्षण मिळावे अशी मागणी केली. | मा. अध्यक्षानी नाबार्ड/ APEDA/DGFT यांना याबाबत योग्य त्या कार्यवाहीसाठी सुचना दिल्या. | नाबार्ड / APEDA / DGFT |
| ५ | श्री महादेव वडणे द्राक्षउत्पादक माळुब्रा | द्राक्ष उत्पादन करताना मजूरीचे दर वाढले असल्याने महाराष्ट्र शासनाच्या मनरेगा या योजनेतून मदत मिळणे बाबत सांगितले. Sampling साठी प्रत्येक प्लॉटला रु. १०००० खर्च येतो यामध्ये शासनाचे अनुदान मिळणे बाबत मागणी केली. | मनरेगा विभाग जिप. व कृषी विभाग यांनी या बाबत वरीष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार करावा.मा. अध्यक्षांनी सुचित केले. | मनरेगा विभाग जिप. अधिक्षक कृषी अ. |
| ६ | श्री संजय देशमाने मराठवाडा प्रदेश सचिव लघु उद्योग भारती उस्मानाबाद | आपला जिल्हा आकांक्षीत जिल्हयाच्या यादीत असून निती आयोगाच्या माध्यमातून निर्यात बाबत प्रशिक्षण व नविन प्रस्तावीत वडगाव सिध्देश्वर एमआयडीसी येथे Banking facility center उभारले जाऊन Export hub तयार करता येईल असे नमूद केले. | या बाबत मा. अध्यक्षांनी DGFT व APEDA यांना जिल्हयामध्ये निर्यात विषयक Outreach programmes आयोजित करणेबाबत सुचना दिल्या. | DGFT व APEDA |
| ७ | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी | निर्यात करणारे उद्योग घटकांनी जिल्हयातील बँका मार्फत व्यवहार केला तर बँके मार्फत Export price reflect होईल असे नमुद केले. | बँका मार्फत निर्यातीसाठीच्या योजनांची माहिती व दिलेल्या अर्थसहाय्याची माहिती समितीला सादर करावी असे मा. अध्यक्षांनी सुचित केले. | LDM |
| ८ | प्रादेशिक अधिकारी, MIDC लातूर | निर्यात विषयक उद्योग घटकांची माहिती. | अस्तित्वात असलेले व नियोजित असलेले औद्योगीक वसाहती, नोंदणी कृत उद्योगघटक व निर्यात करणारे उद्योग घटक यांची माहिती सादर करणे बाबत, मा. अध्यक्षानी सुचित केले. | RO MIDC Latur |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९ | जिल्हा वस्तू व सेवाकर अधिकारी उस्मानाबाद | निर्यात विषयक उद्योग घटकांची माहिती. | या बाबत मा. जिल्हाधिकारी यानी जिल्हयातील निर्यात होणारी उत्पादने, उत्पादक, निर्यातदार यांचेकडून सेक्टर निहाय जमा होणाऱ्या (GST) चा डाटा बेस तयार करणे बाबत सुचित केले. | GST अधिकारी उस्मानाबाद |
| १० | महाव्यवस्थापक जिउके उस्मानाबाद | उस्मानाबादी शेळी व भूम खवा साठी GI Tagging बाबत. | या बाबत महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, उस्मानाबाद यांनी उस्मानाबादी शेळीचा GI Taging चा प्रस्ताव पशु सर्वधन विभागा मार्फत चेन्नई येथे सादर असून खवा बाबत खवा क्लस्टर भूम यांनी प्रस्ताव तयार करावा असे मा. अध्यक्षांनी सुचित केले. | पशुसवर्धन विभाग जिप/ खवा क्लस्टर भूम / जिउके उस्मानाबाद |
| ११ | मा. प्रविण नलावडे उपसंचालक DGFT पुणे . | DGFT पुणे या बाबत मा. श्री प्रविण नलावडे, यांनी सभेस VC द्वारे उपस्थित राहीन सविस्तर मार्गदर्शन केले व जिल्हा स्तरावर Export Potential ओळखुन सर्व शासकीय व बिगर शासकीय स्टेक होल्डर यांचेकडून इनपुट घेवून Export Hub साठी निर्यात कृती आराखडा तयार करणेबाबत माहिती दिली. | या बाबत मा. जिल्हाधिकारी यांनी सर्व स्टेक होल्डर यांचकडुन माहिती संकलन जिल्हा उद्योग केंद्राने करावे व दि.३१.१२.२०२० पर्यंत DGFT यांनी जिल्हा चा आराखडा अंतिम करणेबाबत निर्देश दिले. | DGFT / जिल्हा उद्योग केंद्र |
| १२ | मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, उस्मानाबाद | जिल्हयातील ८३ टक्के जनता ग्रामीण भागात राहत असून कृषी उत्पन बाजार समिती मार्फत सर्व मालाची विक्री होते. जिल्हयात शेती पूरक व्यवसाय पशुपालन शेळीपालन, फळे व भाजी पाला प्रक्रिया याना वाव आहे. खव्याचे उत्पादन मोठया प्रमाणात होत असून खवा क्लस्टर भूम च्या माध्यमातून गोकुळ सारखी निर्यातक्षम उत्पादने तयार करता येतील Identification of products करून निर्यात यंत्रणेशी Supply Chain ने जोडणे गरजेचे आहे. | या बाबत १५ ते २० दिवसात सर्व माहिती in put सुचना सर्व समिती सदस्याकडुन घेऊन Database तयार करावा असे आदेशित केले.जिल्हयातील १. Products & Services Identify करणे २. District Export Action Plan निश्चित करणे ३. गरजेप्रमाणे तालुकास्तरीय Outreach programmes, workshops, seminars आयोजित करणे बाबत सर्व संबधीत स्टेक होल्डर यंत्रणाना सुचित केले. या नुसार DGFT पुणे यांनी जिल्हयाचा अतिम District Export Action Plan, तयार करावा असे मा. अध्यक्षानी निर्देश दिली. | DGFT / APEDA / सर्व यंत्रणा |

बैठकीच्या शवटी मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने श्री पी. डी. हणबर महाव्यवस्थापक, तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, उस्मानाबाद
तथा जिल्हा निर्यात प्रचालन समिती

जिल्हाधिकारी,
तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, उस्मानाबाद

3848/20/11